P.V.G.'s

# Muktangan English School & Jr. College,

44, Vidyanagari, Parvati, Pune - 411009.

## Terminal Examination - (2025-26)

## Standard - X

**Subject : Marathi** **Marks : 80**

**Date : 11/10/2025** **Time : 1.45pm. to 4.45pm.**

### विभाग १ – गद्य

**प्रश्न १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेला सूचनेनुसार कृती करा.**

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचला. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळे कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्याची वेळ आली. त्यावेळी तर आणखी एक मोठं संकट समोर आलं. त्यावेळची हायस्कूलची प्रवेश फी एकवीस रुपये होती; पण आमच्याजवळ एवढे पैसे कुठून येणार? प्रवेश फी भरणे शक्य नसल्यामुळे आता माझे शिक्षण थांबणार असे वाटू लागले; पण माझ्या आईने धीर सोडला नाही. आजूबाजूच्या बिऱ्हाडांतील काही कामे करून तिने पैसे जमवण्यास सुरुवात केली. त्याचवेळी तिच्या परिचयातील एक माऊली मदतीला धावली आणि माझ्या प्रवेश फीची व्यवस्था झाली; पण तोपर्यंत गिरगावातील त्यावेळच्या नामांकित शाळांमधले प्रवेश बंद झाले होते.

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** **[2]**

उताऱ्यात आलेल्या
डॉ. माशेलकरांच्या
बालपणीच्या आठवणी.

**२) चौकटी पूर्ण करा.** **[2]**

१) लेखकाच्या गिरगावातील घराचे नाव –

२) हायस्कूलची प्रवेश फी –

**३) स्वमत – 'माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान' याविषयी तुमचे विचार लिहा.** **[3]**

**(आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेला सूचनेनुसार कृती करा.**

''काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलाचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत,'' सुमित बोलत होता. ''बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत,'' स्नेहल गहिवरून म्हणाली.

अभिषेक भारावून म्हणाला, ''माझ्या तर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार. ठरलं एकदम!''

''खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ  मस्ट,'' अभिषेकचे बाबा म्हणाले.

रेखामावशी सगळ्यांचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.

**१) चौकटी पूर्ण करा.** **[2]**

१) स्नेहलने केलेला निश्चय –

२) अभिषेकने केलेला निश्चय - [ ]

**२) एका वाक्यांत उत्तरे लिहा.** **[2]**

१) तुमच्या पावलांचा रंग कशावरून ठरतो?

२) 'पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट' असे अभिषेकचे बाबा का म्हणाले?

३) स्वमत - 'तापान फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा. **[3]**

**(इ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेला सूचनेनुसार कृती करा.**

अडचणींनी आणि रोगांनी भांबावून जाण्याचे काय कारण आहे? संकटे ही काही कायमची नसतात ना? मग त्यांच्याकडे सोशिकपणे, खिलाडू वृत्तीने पाहण्याची दृष्टी का असू नये? संकटांचे जेव्हा आपल्यावर आक्रमण होते, तेव्हा ती फार मोठी किंवा असह्य वाटतात; परंतु ती ओसरल्यावर, आपण त्यांना का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही. आपण घाबरतो याचे कारण आपल्याजवळ मनाची स्थिरता किंवा शांती नसते. मनाची शांती नसते याचे कारण अडचणींचे खरेखुरे स्वरूप आपणांस कळलेले नसते. जीवन म्हणजे संकटे नव्हेत, कारण ती असतानाही जीवन चालूच असते. मळभ आल्याने सूर्य जसा नाहीसा होत नाही, त्याचप्रमाणे रोगांनी नि संकटांनी जीवनाचे मूळ आनंदी स्वरूप नाहीसे होत नाही. आजारी व संकटग्रस्त माणसेही जेव्हा थट्टा-विनोद करतात, तेव्हा ती या आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

**१) आकृतिबंध पूर्ण करा.** **[2]**

| | संकटाकडे पाहण्याची दृष्टी अशी असावी - | |
|---|---|---|
| [ ] | | [ ] |

**२) कधी ते लिहा.** **[2]**

१) संकटाला आपण का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही.

२) आजारी, संकटग्रस्त माणसे आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

## विभाग २ – पद्य

**प्रश्न २ अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

**१) एका शब्दांत उत्तर लिहा.** **[1]**

१) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट - [ ]

२) पोलादासारखे शेकले गेले - [ ]

**२) खालील आशयाच्या कवितेतील ओळी शोधा.** **[2]**

१) संकटात डोळ्यातील आसवे मित्र म्हणून मदतीस आले.

२) रोजची भूक भागवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आयुष्याचे दिवस वाया गेलेत.

**३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** **[2]**

१) दारिद्र्य - २) दुनियेचा -

३) डोईवर - ४) हरघडी -

**४) काव्यसौंदर्य –** **[3]**

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

'दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे याच शाळेत शिकलो.'

**(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

| | **'अंकिला मी दास तुझा'** | | **'योगी सर्वकाळ सुखदाता'** | |
|---|---|---|---|---|
| १) | प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री | | १) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री | **[1]** |
| २) | कवितेचा रचना प्रकार | किंवा | २) कवितेचा रचना प्रकार | **[1]** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३) | कवितेचा विषय | | | ३) कवितेचा विषय | [1] |
| ४) | कवितेतील आवडलेल्या दोन ओळी | | | ४) कवितेतील आवडलेल्या दोन ओळी | [2] |
| ५) | कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे | | | ५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे | [2] |
| ६) | शब्दांचे अर्थ लिहा – | | | ५) शब्दांचे अर्थ लिहा – | [1] |
| | १) अंकिला २) माझिया | | | १) क्षाळणे २) उदकाची | |

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्रश्न ३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[6]**

१) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.

२) 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

३) टीप लिहा – डॉ. होमी भाभा

४) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

## विभाग ४ – व्याकरण

**प्रश्न ४ अ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **[2]**

१) अहाहा! किती सुंदर फूल आहे हे!

२) काल खूप पाऊस पडला.

**आ) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.** **[2]**

१) आज पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा.)

२) प्रवासात भरभरून बोलावे. (आज्ञार्थी करा.)

**इ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** **[4]**

१) डोळे पाणावणे –

२) ऋण असणे –

३) गलका करणे –

४) सुरुंग लावणे –

**ई) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[1]**

१) वसाहत –　　　　　　　　२) वार्ता –

**उ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[1]**

१) स्वच्छ ×　　　　　　　　२) अस्त ×

**ऊ) खालील शब्दांचे वचन बदला.** **[1]**

१) भाजी –　　　　　　　　२) टोमणा –

**ए) खालील शब्दांचे लिंग बदला.** **[1]**

१) स्त्रिया –　　　　　　　　२) दास –

**ऐ) विरामचिन्हे ओळखा.** **[1]**

| विरामचिन्ह | नाव |
|---|---|
| ‘‘________’’ | |
| • | |

**ओ) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **[1]**

१) सात दिवसांचा समूह – ☐

२) पायात चप्पल नसणारा – ☐

**औ) खालील वाक्ये लेखननियमानुसार लिहा.** **[2]**

१) लींबाचा रस तर मला अमृतासारखा वाटु लागला.

२) अणेक ठिकाणी ऊसवलेल्या स्वेटरमधून थंडी जाणवत होती.

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्रश्न ५ अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[6]**

**पत्रलेखन –**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

**संत गाडगेबाबा विद्‌यालय**
संतभूमी चौक, अमरावती.
शाळेच्या 'विद्यार्थी मंडळ'
तर्फे आयोजित
'एकपात्री अभिनय स्पर्धा'
दि. १४ नोव्हेंबर सकाळी ११ वाजता
मुख्याध्यापक

↓

अमिता / अमित पवार
विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

↓

| | | |
|---|---|---|
| स्पर्धेसाठी शाळेचे सभागृह उपलब्ध करून द्यावे यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांना विनंती करणारे पत्र लिहा. | किंवा | स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त स्वाती / सुयश देसाई यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

किंवा

**सारांश लेखन –**

विभाग–१ गद्य (इ) – अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[10]**

**१) जाहिरात लेखन –**

'आयुर्वेदिक केशतेलाची' आकर्षक जाहिरात तयार करा.

**२) बातमी लेखन –**

खालील निवेदन वाचून बातमी तयार करा.

| |
|---|
| अभिनव विद्यालय, नागपूर |
| ‘भव्य पुस्तक प्रदर्शन’ संपन्न |
| दि. ३ ते ५ ऑक्टोबर |
| **प्रमुख पाहुणे –** श्री. आशिष वाघ, (ज्येष्ठ कवी) |
| **आयोजक –** अभिनव विद्यालय, नागपूर |
| उद्घाटन सोहळा संपन्न |
| २५ शाळांचा सहभाग |
| विविध प्रकारची पुस्तके |
| विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद |

**३) कथालेखन**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा व कथेस योग्य शीर्षक द्या.

**मुद्दे –**

एक गरीब मुलगा ............. शाळेची फी भरण्यास पैसे नसणे ................. सकाळी पेपर टाकण्याचे काम ............... वाटेत पैशाचे पाकीट मिळणे ................. प्रामाणिकपणे पोलीस स्टेशनवर नेऊन देणे ........................ पाकिटाच्या मालकास आनंद ................. बक्षीस.

**इ) निबंधलेखन – खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत निबंध लिहा.** **[8]**

**१) प्रसंग लेखन –**

शाळेत साजऱ्या झालेल्या स्वातंत्र्यदिनाच्या (१५ ऑगस्ट) कार्यक्रमास तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

**२) आत्मकथन –**

वृक्षाचे आत्मकथन



**३) वैचारिक –**


पाण्याचे महत्त्व
पाण्याचे प्रदूषण कसे रोखाल?
'पाण्याची बचत' काळाची गरज
शेती, उद्योग-व्यवसायावर होणारा परिणाम
कोणत्या उपाययोजना कराल?

❖❖❖